# संख्येचे विस्तारित रूप

३५ या संख्येत ३ ची स्थानिक किंमत ३० आहे. ५ ची स्थानिक किंमत ५ आहे, म्हणून ३५ ही संख्या म्हणजे ३० + ५.

३० + ५ ला ३५ चे विस्तारित रूप म्हणतात.

९४ चे विस्तारित रूप ९० + ४ आहे.

६० चे विस्तारित रूप ६० + ० आहे.

| ३५ | २४ | ७३ | ४९ |
|---|---|---|---|
| ३० ५ | २० ४ | ७० ३ | ४० ९ |
| तीस आणि पाच | वीस आणि चार | सत्तर आणि तीन | चाळीस आणि नऊ |
| ३० + ५ | २० + ४ | ७० + ३ | ४० + ९ |

**यावरून आपल्या लक्षात आले का?**

३५ चे विस्तारीत रूप → ३० + ५

७३ चे विस्तारीत रूप → ७० + ३

२४ चे विस्तारीत रूप → २० + ४

४९ चे विस्तारीत रूप → ४० + ९

**खालील संख्यांची विस्तारित रूपे लिही.**

| संख्या | अक्षरी रूपे | विस्तारीत रूप |
|---|---|---|
| ३२ | तीस आणि दोन | ३० + २ |
| १० | ········ आणि ········ | |
| ६४ | ········ आणि ········ | |
| १७ | ········ आणि ········ | |

**थोडी गंमत :**

पान ९ वर तू पूर्ण केलेला तक्ता पाहून सांग.

- **१० ते १०० या संख्यांमध्ये...**

→ ५ हा अंक दशकस्थानी किती वेळा आला आहे ? ☐

→ त्या संख्या वहीत लिही.

- **१० ते ९९ या संख्यांमध्ये...**

→ ० हा अंक एककस्थानी किती वेळा आला आहे ? ☐

→ त्या संख्या वहीत लिही.

**सराव :**

- अधोरेखित अंकाची स्थानिक किंमत लिही.

| | |
|---|---|
| १६ = ........ | ७७ = ........ |
| ४८ = ........ | ८२ = ........ |
| ५४ = ........ | ९१ = ........ |

- विस्तारित रूपावरून संख्या लिही.

| | |
|---|---|
| ७० + ८ = ☐ | ९० + ७ = ☐ |
| ६० + १ = ☐ | ८० + ० = ☐ |

- रिकाम्या जागा भर.

☐ → १०, १     ५२ → ५०, ☐     ९८ → ☐, ८

७६ → ७ दशक, ☐     ☐ → ४ दशक, ० एकक     ८७ → ☐, ७ एकक

XV1AH3